# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

**प्रभात** पुणे, बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०१५

# नेटबॉल स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयाची हॅट्ट्रिक

## 'उत्कृष्ट शूटिंग' खेळाडू चषकाने तृप्तीचा गौरव

**राजगुरुनगर, दि. २७ (प्रतिनिधी)** - हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सोमवारी (दि. २६) पुणे जिल्हा क्रीडा विभागांतर्गत झालेल्या मुलींच्या नेटबॉल स्पर्धेचे विजेतपद राजगुरू महाविद्यालयाने पटकावून सलग तिसऱ्या वर्षी विजेतपदाची नोंद करून हॅट्ट्रिक केली.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मुलींच्या नेटबॉल स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी संजयकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, पुणे जिल्हा क्रीडा विभागाचे सहसचिव शैलेंद्र कांबळे, मंगेश पालवे उपस्थित होते.

या स्पर्धेत येथील राजगुरू महाविद्यालयाने विजेतपद पटकावून सलग तिसऱ्या वर्षी हॅट्ट्रिक केली आहे. टी. सी. कॉलेज बारामती या संघाला उपविजेतपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत बारामती, जुन्नर, चाकण, डेहणे, वरवंड आणि राजगुरूनगर अशा ६ महाविद्यालयीन संघांनी सहभाग घेतला. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची विद्यार्थिनी तेजश्री जाधव हिला 'उत्कृष्ट खेळाडू' म्हणून तर बारामतीच्या तृप्ती बारवकर हिला 'उत्कृष्ट शूटिंग' खेळाडू चषक देऊन गौरविण्यात आले. राजगुरू महाविद्यालयाच्या तेजश्री जाधव, आश्विनी पडवळ, पूजा लोंढे, कोमल जाधव या विद्यार्थिनींची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत २ व ३ नोव्हेंबर रोजी चाकण महाविद्यालयात होणाऱ्या आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेचे आयोजन क्रीडा विभागाचे प्रा. डी. जे. टाकळकर आणि प्रा. सुनील पानसरे यांनी केले.



राजगुरूनगर : येथे नेटबॉल स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना उपविभागीय पोलीस अधिकारी संजयकुमार पाटील.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख